# मुंबई विद्यापीठ

( नॅक व्दारे A++ पुनर्मुल्यांकित )

महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in ई-मेल : dr.estab@fort.mu.ac.in दूरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४

**जाहिरात क्र.: मुंवि/मासंविक/०१/लोककला/२०२२, दि. २८ मे, २०२२**

मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमी येथे खालील पदे कंत्राटी तत्वावर ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | तालवाद्य प्रशिक्षक (Rhythm Instructor) | १ |
| २ | वादक प्रशिक्षक (Instrument Instructor) | १ |
| ३ | गायन प्रशिक्षक (Singing Instructor) | १ |
| ४ | अभिनय प्रशिक्षक (Acting Instructor) | १ |
| ५ | नृत्य प्रशिक्षक (Dance Instructor) | १ |
| ६ | कलावंत समन्वयक (Artist Co-ordinator) | १ |
| ७ | संशोधन समन्वयक (Research Co-ordinator) | १ |
| ८ | द्रुकश्राव्य तंत्रज्ञ (Audio Video Technician) | १ |
| ९ | वाद्य आणि कपडेपट सहायक (Curtain and Instrument Handler) | १ |

**उपरोक्त पदांना आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | पदनाम व मानधन | शैक्षणिक अर्हता, अनुभव, वयोमर्यादा इत्यादी. |
|---|---|---|
| **१** | **(तालवाद्य प्रशिक्षक,<br>वादक प्रशिक्षक,<br>गायन प्रशिक्षक,<br>अभिनय प्रशिक्षक,<br>नृत्य प्रशिक्षक)**<br><br>**मानधन :-<br>(रु. २६,०००/- प्रतिमाह)** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**<br>१) प्रयोगात्म कला शाखेतील नृत्य, नाट्यशास्त्र, संगीत आणि प्रयोगात्म लोककलेची पदव्युत्तर पदवी / पदविका आवश्यक<br>२) प्रयोगात्म लोककला क्षेत्रातील संबंधित प्रशिक्षक पदाचा किमान १ वर्षे अनुभव<br>***किंवा***<br>१) नामांकित संस्थेत संबंधित प्रशिक्षक पदाचा ५ वर्षांचा अनुभव तसेच लोककला क्षेत्रात महत्वपुर्ण योगदान देणारे असामान्य व्यक्तीमत्व.<br>***किंवा***<br>१) आकाशवाणी दुरदर्शनचे संबंधित क्षेत्रातील 'अ' श्रेणी प्रमाणपत्र धारक.<br><br>**वयोमर्यादा :** किमान ३५ वर्ष व कमाल ६० वर्ष. |

| अ.क्र. | पदनाम व मानधन | शैक्षणिक अर्हता, अनुभव, वयोमर्यादा इत्यादी. |
|---|---|---|
| २ | **(कलावंत समन्वयक, संशोधन समन्वयक)**<br><br>**मानधन :-**<br>**(रु. २४,०००/- प्रतिमाह)** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**<br>१) कोणत्याही सांविधानिक विद्यापीठाची पदवी. (मराठी लोकसाहित्य विषयातील पदवी/पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.)<br>२) लोककला क्षेत्रातील नामांकित संस्थेत संबंधित समन्वयक पदाचा किमान ३ वर्षे अनुभव.<br><br>**वयोमर्यादा :** किमान ३५ वर्ष व कमाल ६० वर्ष. |
| ३ | **द्रुकश्राव्य तंत्रज्ञ**<br><br>**मानधन :-**<br>**(रु. २४,०००/- प्रतिमाह)** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**<br>१) कोणत्याही सांविधानिक विद्यापीठाची पदवी. (शासकीय मान्यताप्राप्त संस्थेची साऊंड इंजिनीअरींग पदविका धारकास प्राधान्य.)<br>२) लोककला क्षेत्रातील नामांकित संस्थेत ध्वनीमुद्रण समन्वयक/ द्रुकश्राव्य तंत्रज्ञ पदाचा किमान ३ वर्षे अनुभव.<br><br>**वयोमर्यादा :** किमान ३५ वर्ष व कमाल ६० वर्ष. |
| ४ | **वाद्य आणि कपडेपट सहायक**<br><br>**मानधन :-**<br>**(रु. ११,०००/- प्रतिमाह)** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**<br>१) किमान १२ वी उत्तीर्ण.<br>२) नाट्य क्षेत्रातील नामांकित संस्थेत वाद्य आणि कपडेपट सहायक पदाचा किमान ३ वर्षे अनुभव.<br><br>**वयोमर्यादा :** किमान ३५ वर्ष व कमाल ६० वर्ष. |

## अर्जदारांसाठी सूचना

उमेदवारांनी आपले अर्ज सादर करण्यापुर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय इत्यादी बाबी पडताळून पहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) उपरोक्त पदे केवळ ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात व ठोक मानधनावर भरण्यात येणार असल्याने या पदावरील कर्मचाऱ्यास शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२) उपरोक्त सर्व पदांकरीता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांकरीता मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्राचे रहिवाशी असलेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

४) उपरोक्त पदांकरीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक **दि. ३०/०५/२०२२ ते १८/०६/२०२२ सायं. ५ वा. पर्यंत** राहील.

५) ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर https://muappointment-lokkala.mu.ac.in/ या लिंकवर उपलब्ध होईल. भरतीप्रक्रियेचे पुढील टप्पे, मुलाखतीचा दिनांक, निकाल इत्यादी बाबी देखील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जातील त्याकरीता उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट द्यावी.

६) उपरोक्त लिंकवर गेल्यानंतर उमेदवारास सर्वप्रथम 'Register Now' या बटणावर क्लिक करुन नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी झाल्यानंतर ईमेल आयडी व पासवर्डच्या सहाय्याने लॉग इन करुन विविध पदांकरीता ऑनलाईन अर्ज सादर करता येईल.

७) एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक राहील. प्रत्येक अर्जासाठी नव्याने नोंदणी करणे आवश्यक नाही मात्र प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्जशुल्क भरणे आवश्यक आहे.

८) उमेदवारांनी अर्जाचे शुल्क रु.२००/- (रुपये दोनशे मात्र) क्रेडीट कार्ड / डेबिट कार्ड / इंटरनेट बॅंकींग / भीम UPI व्दारे ऑनलाईन पध्दतीने भरावे लागेल.

९) ऑनलाईन अर्ज सादर करतांना उमेदवारांनी स्वत:चा स्कॅन केलेला पासपोर्ट आकाराचा फोटो, सही व स्कॅन केलेले शैक्षणिक प्रमाणपत्रे तयार ठेवावीत. तसेच उमेदवारांकडे स्वत:चा वैध ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे.

१०) ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे उमेदवारास मुलाखती करीता पात्र किंवा अपात्र ठरविण्यात येईल मात्र मुळ प्रमाणपत्रांची तपासणी केल्यानंतरच नियुक्तीपत्र देण्यात येईल.

११) ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर सदर अर्जाची प्रिंटआऊट काढुन त्यासोबत शैक्षणिक, अनुभवाबाबतच्या व ईतर प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रतींचा एक संच कुलसचिव, मुंबई विद्यापीठ कक्ष क्र.२५, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ या पत्त्यावर पाठविण्यात यावा.

१२) अर्ज छाननीअंती जे उमेदवार अपात्र ठरतील त्यांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही.

१३) उमेदवारांना स्वखर्चाने चाचणी/मुलाखतीस उपस्थित राहावे लागेल.

१४) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सादर केलेली माहिती/प्रमाणपत्रे चुकीची/खोटी आढळल्यास त्याची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

१५) उपरोक्त पदे केवळ ११ महिन्यांकरीता हंगामी स्वरुपातील व ठोक मानधनावर भरण्यात येणार असून सदर पदांवर कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत उमेदवारांस कोणताही दावा करता येणार नाही. तसेच अशी विनंती केल्यास ती मान्य केली जाणार नाही. (संदर्भ : शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट, २००५)

१६) उपरोक्त पदांवर नियुक्त कर्मचाऱ्यांची सेवा ११ महिन्यानंतर आपोआप संपुष्ठात येईल. सदर कर्मचाऱ्यांची मागील कामगीरीचा आढावा घेऊन पुनर्नियुक्ती करण्याचे अधिकार कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांना राहतील.

१७) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याकडून आवश्यक अटी व शर्ती अंतर्भुत करुन करारनामा करुन घेण्यात येईल.

१८) उपरोक्त पदांवर हंगामी स्वरुपातील नियुक्त कर्मचाऱ्यांची, आवश्यकतेनुसार कोणतीही पूर्वसूचना/कारणे न देता सेवा समाप्त करण्याचे अधिकार विद्यापीठ प्रशासनास राहतील.

१९) सदर जाहिरातीतील पदसंख्या, अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचे अधिकार कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांना राहतील. यासंदर्भात त्यांचा निर्णय अंतीम राहील.

२०) शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापुर्वी त्यांच्या कार्यालय प्रमुखांची लेखी पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

२१) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दडपण तथा राजकीय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांस अपात्र समजले जाईल.

२२) महाराष्ट्र शासनाने भरतीकरीता वेळोवेळी जाहीर केलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके बंधनकारक राहतील.

सही /-

**कुलसचिव**

**मुंबई विद्यापीठ**